मुख्य अभियंता कार्यालय
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका
जावक क्रमांकः- २३५८
दिनांकः- ०६/०७/२०२६

# कार्यालयीन परिपत्रक

विषयः- पुणे शहरामधील पाणीकपात ७ जुलै २०२६ पासून स्थगित करण्यात येत असलेबाबत.

संदर्भः- १) पाणीकपात लागू करणेबाबत पुणे मनपा जाहिर निवेदन (प्रेस नोट)
२) मा.महापौर, पुणे महानगरपालिका यांचे दि.६/७/२०२६ रोजीचे बैठकी दरम्यानचे आदेश.

पुणे शहरासाठी पाणीपुरवठा करणाऱ्या धरण क्षेत्रामध्ये मागील कालावधीमध्ये (दि.१४/६/२०२६ अखेर) पाऊस न झाल्याने व धरणामधील पाणीसाठा कमी असल्याने संदर्भ क्र.१ च्या जाहिर निवेदनानुसार दि.१५/६/२०२६ पासून पुणे शहरामध्ये एक दिवसाआड पाणी देण्याचे नियोजन करून त्याअन्वये पाणी कपात करण्यात आली आहे. सद्यस्थितीत धरण क्षेत्रामध्ये सुरू असलेल्या पावसामुळे धरणामधील पाणी साठयामध्ये वाढ होत असून पुणे शहरामध्ये पालखी २०२६ चे औचित्य साधून बहुसंख्येने वारकरी समूदाय यांचे आगमन होत असल्याने तूर्तास दि.७/७/२०२६ पासून ते दि.१२/७/२०२६ पर्यंत संबंधीत पाणीकपात रद्द करण्यात येत आहे. तसेच दि.१२/७/२०२६ अखेर धरण क्षेत्रामध्ये पडणारा पाऊस व धरणामधील पाणीसाठा याबाबी विचारात घेऊन पाणीकपाती बाबत पुढील निर्णय घेण्यात येईल.

तरी पाणीपुरवठा विभागाकडील सर्व अधिक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता, जलशुध्दीकरण केंद्र व पंपिंग तसेच वितरण विभाग यांनी याची नोंद घेऊन वरील नमूद कालावधीमध्ये पुणे शहरातील पाणीपुरवठा सुरळीत राहिल याची दक्षता घ्यावी.

(नंदकिशोर जगताप)
मुख्य अभियंता
पाणीपुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

प्रतः- १) विभाग प्रमुख
माहिती व तंत्रज्ञान विभाग
पुणे महानगरपालिका
२) जनसंपर्क अधिकारी
पुणे महानगरपालिका
यांजकडेस पुढील कार्यवाहीसाठी सादर.......